# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
# कर्मचारी सहकारी पतसंस्था (मर्यादित), मुंबई

(रजि. नं. बी.ओ.एम./बी.एन.के./७२७ दि. १५-११-१९७५)
४०/२०३९, सन्मित्र को.ऑ.हौ.सोसा., गांधीनगर, बांद्रा (पू), मुंबई - ५१
फोन : २६४१३०५६, टेलिफॅक्स : २६४३५०३३
प्रकाशगड, प्रा. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई - ५१. फोन : २६४७४२११ विस्ता. क्र. : ३५८८


---

## सेवानिवृत्ती मृत्यूंजय योजना स्वरुप व नियमावली

**सेवानिवृत्त सभासद व पतसंस्थेचे कर्मचारी यांना सेवानिवृत्त मृत्यूंजय योजने अंतर्गत लाभ मिळण्यासाठी अटी, शर्ती व नियम.**

१) या योजनेस म.रा.वि.मं. कर्म. सह. पत. मर्या. मुंबई या संस्थेच्या निवृत्त सभासदांसाठी व पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी "सेवानिवृत्ती मृत्युंजय योजना" असे संबोधले जाईल.

२) पतसंस्थेच्या सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदाने पतसंस्थेचे नाममात्र सभासदत्व स्विकारले असले पाहिजे तर पतसंस्थेचा कर्मचारी वयोमान निवृत्तीमुळे पतसंस्थेतून निवृत्त झालेला असला पाहिजे.

३) सभासद जेव्हा सेवानिवृत्त होईल त्यापूर्वी किमान सलग ३ वर्षे पतसंस्थेचा सभासद असला पाहिजे.

४) सभासद सेवानिवृत्त झालेल्या तारखेपासून पुढील ३ वर्षे कालावधीसाठीच त्याला या योजनेचा लाभ लागू राहील. सदर ३ वर्ष मर्यादेचा आढावा घेऊन त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतील. ते तिथून पुढे लागू करण्यात येतील.

५) सभासदाने संस्थेकडून अंतिम रक्कम घेतेवेळी जो वारसदार नेमला असेल फक्त त्यालाच मदतनिधी दिला जाईल. एकदा नेमलेला वारसदार बदलता येणार नाही तथापि योजनेचा लाभार्थी वारसदार मृत्यू पावल्यास, चार महिन्यांच्या आत त्याऐवजी नवीन वारसदार दाखल करण्याची जबाबदारी सेवानिवृत्त सभासदाची राहील. वारसदाराच्या मृत्यूच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक राहील.

६) सेवानिवृत्त सभासद मृत्यु पावल्यानंतर वारसदाराने ४ महिन्यांच्या आत कागदपत्रे सादर करुन मदतनिधीची मागणी केली पाहिजे, त्यानंतर वारसदारास हा लाभ मिळणार नाही.

७) मदतनिधीसाठी दावा दाखल करताना सभासदाच्या मृत्यू दाखल्याची सक्षम अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. दावा दाखल करणाऱ्या वारसदारास ओळखणाऱ्या संस्थेच्या २ सभासदांची शिफारस सादर करावी लागेल. तसेच पतसंस्थेने दिलेले प्रमाणपत्र परत करावे लागेल.

८) सभासद निवृत्त झाला व त्याच्याकडून संस्थेचे कर्ज येणे बाकी असेल किंवा त्याच्यावर जामिनकीची जबाबदारी असेल किंवा त्याने संस्थेची बदनामी / फसवणूक केलेली असेल अशा सभासदाच्या वारसदारास या योजनेचा लाभ देण्याबाबत अंतिम अधिकार सर्व परिस्थितीचा सारासार विचार करुन संचालक मंडळ व मृत्यूंजय योजना समितीचा असेल.

९) दुर्दैवाने काही नैसर्गिक आपत्ती उद्‌भवल्यास किंवा एकाच वर्षात प्रमाणापेक्षा जास्त सेवानिवृत्त सभासद मृत पावल्यास मदतनिधी रकमेमध्ये परिस्थितीनुरुप बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळाचा व मृत्यूंजय योजना समितीचा असेल.

१०) सेवानिवृत्तीनंतर सभासदाला प्रमाणपत्र देण्यात येईल. सेवानिवृत्त सभासदाचा त्याच्या सेवानिवृत्ती दिनांकापासून पुढे ३ वर्षे कालावधीत अपघाती अथवा नैसर्गिक प्रकारे मृत्यू झाला तर त्याने नेमलेल्या वारसदारास कमाल रु. २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार फक्त) पर्यंत रक्कम खाली नमूद केलेल्या सभासदत्वाच्या कालावधीच्या श्रेणीनुसार मदत म्हणून दिली जाईल.

| पतसंस्थेतील सभासदत्वाचा कालावधी | मदत रक्कम |
|---|---|
| १) ०३ वर्षे १ दिवस ते ५ वर्षे पूर्ण | रु. २५,०००/- |
| २) ०५ वर्षे १ दिवस ते १० वर्षे पूर्ण | रु. ५०,०००/- |
| ३) १० वर्षे १ दिवस ते १५ वर्षे पूर्ण | रु. १,००,०००/- |
| ४) १५ वर्षे १ दिवस ते २० वर्षे पूर्ण | रु. २,००,०००/- |
| ५) २० वर्षे १ दिवस ते त्यापुढील कालावधी | रु. २,५०,०००/- |

तसेच सभासदत्वास २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी पूर्ण झालेल्या सभासदाची पतसंस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर बदल झाली असेल आणि कार्यक्षेत्राबाहेरच पुढील ३ वर्षात तो सेवानिवृत्त होणार असेल परंतु अशा सभासदाने जर अंतिम रक्कम परत घेताना त्यांच्या नावे जमा असणारी मृत्यूंजय योजनेतील ठेव रक्कम पतसंस्थेमध्ये ठेवली तर वरील कालावधीचा पूर्ण लाभ देण्यात येईल. अन्यथा ३ वर्षे कालावधीसाठी रु. १,००,०००/- पर्यंतचा लाभ देण्यात येईल. अशा सभासदाने सेवानिवृत्ती नंतर विहित अर्ज भरुन देऊन संस्थेकडून ३ महिन्याच्या आत प्रमाणपत्र घेऊन जाणे आवश्यक आहे.

११) उपरोक्त नियमावलीबाबत अंतिम निर्णय संचालक मंडळ व मृत्यूंजय योजना समितीचा असेल.

१२) उपरोक्त नियमावलीत बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळ व मृत्यूंजय योजना समितीचा असेल.

वरील सर्व अटी, शर्ती व नियम मी वाचले असून मला ते मान्य आहेत आणि माझ्या वारसदारास त्याची माहिती देण्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील.

सभासदाची सही